महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : संकीर्ण-०१२२/प्र.क्र.३५/२०२६/एकतीस दिनांक : २६ जून, २०२६

**-:प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ तसेच आगामी सर्व पूर्व परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित (Computer Based Test - CBT) पद्धतीने आयोजित करण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २५ जून, २०२६ रोजी गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२६ ची २६१९ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून ती संगणक प्रणालीवर आधारित (CBT) घेण्यात येणार आहे.

**२.** राज्य शासनाच्या दिनांक ०५ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये भरती प्रक्रियेमध्ये व्यापक सुधारणा (Recruitment Reforms) करण्यात आल्या असून आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सेवा, संवर्ग, पदसंख्या व उमेदवारांची संख्या यामध्ये पुढील काळात मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. यामुळे विद्यमान ऑफलाईन परीक्षा पद्धतीद्वारे सर्व परीक्षा विहित कालमर्यादेत घेणे जिकिरीचे होणार आहे.

**३.** सध्या आयोगामार्फत दरवर्षी सुमारे ६ ते ७ हजार पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येते. तथापि, शासनाच्या सुधारणा धोरणानुसार आगामी काळात ही संख्या चार ते पाच पट वाढण्याची अपेक्षा असून त्यानुसार परीक्षार्थींची संख्या देखील लक्षणीय वाढणार आहे. ऑफलाईन परीक्षांसाठी जिल्हास्तरीय शाळा व महाविद्यालयांवर अवलंबून राहावे लागते. परीक्षा केंद्रांची मर्यादित उपलब्धता, शैक्षणिक सत्रांमुळे केंद्रे उपलब्ध न होणे, प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक, सुरक्षा व मनुष्यबळ यांमुळे परीक्षा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता वाढते.

**४.** या पार्श्वभूमीवर आयोगाने पूर्व परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित (Computer Based Test - CBT) पद्धतीने घेण्याचे नियोजन केले आहे. या पद्धतीमुळे परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुरक्षितता, कार्यक्षमता आणि वेग वाढण्यास मदत होईल. उत्तरपत्रिकांचे संगणकीय मूल्यमापन, जलद निकाल प्रक्रिया, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता आणि डिजिटल सुरक्षा यामुळे भरती प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व कालबध्द होईल. आयोगाच्या प्रत्येक संवर्गाची भरती प्रक्रिया शक्यतो त्याच वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी CBT पद्धत अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**५.** देशातील अनेक प्रमुख राष्ट्रीय परीक्षा संस्था जसे की कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती मंडळ (RRB), IBPS, CAT, JEE, UGC-NET, MH-CET या सर्व संस्था अनेक वर्षांपासून यशस्वीपणे CBT पद्धतीने परीक्षा घेत आहेत. तसेच केरळ, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार व हिमाचल प्रदेश या राज्य लोकसेवा आयोगांकडूनही गट-अ, गट-ब व गट-क पदांसाठी CBT परीक्षा नियमितपणे घेतल्या जात आहेत.

**६.** एका पेक्षा अधिक सत्रांमध्ये परीक्षा घेतल्यास उमेदवारांच्या गुणांचे Normalization (गुणांचे समानीकरण) करण्यात येणार आहे. यासाठी IIT Bombay सारख्या राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ संस्थांचे तसेच शासनाच्या सांख्यिकी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन वैज्ञानिक, पारदर्शक व न्याय्य पद्धतीने सूत्र निश्चित करण्यात येईल. याबाबतची सविस्तर कार्यपद्धती आयोग स्वतंत्रपणे प्रसिद्ध करेल.

मा. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणी गुणांचे समानीकरण (Normalization) ही प्रक्रिया कायदेशीर, न्यायसंगत व वैध असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावर ऑफलाईन परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने डॉ. के. राधाकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली High Level Committee of Experts (HLCE) नियुक्त केली होती. या समितीने मोठ्या प्रमाणातील परीक्षा भविष्यात CBT पद्धतीने आणि विविध सत्रांमध्ये घेण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार NEET-२०२७ परीक्षा देखील CBT पद्धतीने आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**७.** आयोगामार्फत दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ पासून आतापर्यंत १३८ संवर्गांच्या सरळसेवा व विभागीय परीक्षा CBT द्वारे यशस्वीरित्या घेण्यात आल्या आहेत. तसेच पुढील तीन महिन्यांत आणखी ८१ संवर्गांच्या परीक्षा CBT पद्धतीने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे आयोगास या प्रणालीचा पुरेसा अनुभव उपलब्ध आहे. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असुन (Screening) विविध सत्रामध्ये CBT द्वारे घेण्यात येणार असली तरी मुख्य परीक्षा मात्र एकाच सत्रामध्ये घेण्यात येणार आहे.

**८.** CBT परीक्षा आयोजित करताना तांत्रिक सेवा पुरवठादार संस्था, शासकीय व खासगी अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने इत्यादींच्या संगणक प्रयोगशाळांचा वापर परीक्षा केंद्र म्हणून केला जाईल. तथापि, परीक्षेचे संपूर्ण नियोजन, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता, परीक्षा संचलन, केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, पोलीस बंदोबस्त, कमांड अँड कंट्रोल सेंटरद्वारे देखरेख आणि संपूर्ण प्रशासकीय नियंत्रण आयोगाकडेच राहील. तसेच परीक्षा केंद्रांचे C-DAC मार्फत सुरक्षा परीक्षण (Security Audit) करण्यात येईल. परीक्षेनंतर प्रत्येक उमेदवाराला त्याची Response Sheet त्याच्या प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

**९.** याशिवाय, आयोगामार्फत सन २०२७ पासून महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) संयुक्त पूर्व परीक्षा तसेच गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा वर्षातून दोनपेक्षा अधिक वेळा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी CBT पद्धतीचा अवलंब अपरिहार्य आहे.

**१०.** वरील सर्व बाबी विचारात घेता, आयोगामार्फत पूर्व परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित (CBT) पद्धतीने घेण्याचा निर्णय हा वेळेची गरज, राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम पद्धती, न्यायालयीन मान्यता, तांत्रिक सुरक्षितता आणि वेळबद्ध भरती प्रक्रिया या सर्व दृष्टीने योग्य, न्याय्य व आवश्यक आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणताही संभ्रम न बाळगता CBT द्वारे घेण्यात येणा-या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ संदर्भात परीक्षेची तयारी करावी.

(महेंद्र हरपाळकर)
सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग